# LAXMI COTSPIN LIMITED

(A Govt. Recognized Star Export House & NSE-SME Listed Company)

BCI Better Cotton Initiative ISO 9001 : 2008

Regd. Off.: Gut No. 399, Samangaon – Kajala Phata, Jalna-Ambad Road, Opp. Meenatai Thakare Vridhashram, JALNA - 431 203. (M.S.) India. Off. 09765999633 E-mail: admin@laxmicotspin.com● Web Site: www.laxmicotspin.com

CIN NO - L17120MH2005PLC156866


Ref. No. Date :

Date – 15/11/2021

**To,**
**The Manager**
**Listing & Compliance Department,**
**National Stock Exchange of India Limited Exchange**
Plaza, 5th Floor, Plot No. C/1,
G Block, Bandra-Kurla Complex, Bandra,
Mumbai- 400051.

**(SYMBOL – LAXMICOT ISIN – INE801V01019)**

**Sub.: Submission of Newspaper Cutting of Bell ceremony of Listing of shares from SME Board to Main Board of NSE.**

Pursuant to Regulation 30 read with Schedule III of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, with reference to above subject, please find enclosed newspaper in which news published on dated November 13th 2021 in Dainik Anand nagari (Marathi) and in Lokmat (Marathi) both, news published about Bell ceremony of Listing of shares from SME Board to Main Board of NSE.

This is for your information and record

**Yours Faithfully,**
**For LAXMI COTSPIN LIMITED**

SkRathi

LAXMI COTSPIN LIMITED JALNA

**Sanjay Rathi**
**Managing Director**
**DIN - 00182739**


Branch Office : 3rd Floor, KK Chambers, PT Marg, DN Road, Near Cathedral School, Fort, Mumbai - 400 001 (MS) India.

जालना : अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील अर्जदारांना प्राधान्याने घरगुती वीजजोडणी उपलब्ध करून देण्यासाठी ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या पुढाकाराने १४ एप्रिलपासून सुरू करण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन प्रकाश योजनेत औरंगाबाद परिमंडलातील ८५ ग्राहकांना वीजजोडणी देण्यात आली आहे. यात जालना जिल्ह्यातील २१ जणांचा समावेश आहे.

लोकमत न्यूज नेटवर्क

**जालना :** खंजीर बाळगणाऱ्या दोघांना पोलिसांनी शुक्रवारी अटक केली. स्वप्नील राजू गुमरे (३० रा. नळगल्ली, जुना जालना), संतोष कौतिकराव पारवे (रा. जयभवानी नगर, औरंगाबाद) अशी संशयित आरोपींची नावे आहेत.

त्यांच्याकडून खंजीर जप्त करण्यात आले आहे. शहरातील जिल्हा सामान्य रुग्णालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर रिक्षामध्ये दोन इसम संशयितरीत्या हालचाल करताना दिसून आले. त्याचवेळी पोलीस नियंत्रण कक्षाचे पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांनी त्यांना विचारपूस केली असता, त्यांना उडवाउडवीची उत्तरे दिली.

त्यानंतर पोलिसांनी स्वप्नील राजू गुमरे यांची झाडाझडती घेतली असता, त्याच्याजवळ खंजीर आढळून आला. तर दुसरा इसम संतोष पारवे हा औरंगाबादचा राहणार असून त्याला इकडे कशासाठी आला असे विचारले असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. दोघांना ताब्यात घेऊन कदीम जालना पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

त्यांच्यावर कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक विनायक देशमुख, अपर पोलीस अधीक्षक विक्रांत देशमुख, उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि. प्रशांत महाजन, सुधीर वाघमारे, बाबा गायकवाड यांनी केली आहे.



भाजपचे आ. नारायण कुचे यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवारी पालकमंत्री राजेश यांच्या निवासस्थानावर ट्रॅक्टर मोर्चाचे आयोजन केले होते.

संजय राठी : मराठवाड्यातून प्रथमच लक्ष्मी कॉटस्पीनची एनएसईमध्ये नोंदणी

# उद्योजकांनी स्टॉक एक्सचेंजमध्ये सहभागी होऊन ग्लोबल व्हावे

लोकमत न्यूज नेटवर्क

**जालना :** जालन्यात उद्योग, व्यापार हा नवीन नाही; परंतु आता केवळ स्थानिक पातळीवर व्यवसाय करणे हे काळाशी सुसंगत नाही. त्यामुळे जालन्यातील उद्योजकांनी एनएसई अर्थात नॅशनल स्टॉक एक्सचेंज अर्थात राष्ट्रीयस्तरावरील शेअर बाजारात नोंदणी करून आपल्या उद्योगाला जागतिक पातळीवर घेऊन जाण्याची गरज असल्याचे प्रतिपादन येथील लक्ष्मी कॉटस्पीनचे व्यवस्थापकीय संचालक संजय राठी यांनी केले.

शुक्रवारी सकाळी मराठवाड्यातून प्रथमच स्थानिक उद्योजकांनी एकत्रित येत स्थापन केलेल्या लक्ष्मी कॉटस्पीनची नोंदणी ही एनएसईमध्ये करण्यात आली. ही कंपनी आता देशातील अन्य मोठ्या उद्योगसमूहांच्या रांगेत जाऊन बसली आहे. याचा जालनेकरांना सार्थ अभिमान असून, स्टील उद्योजकांनीदेखील त्यांच्या ब्रॅंडची नोंदणी येथे करण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज व्यक्त करण्यात आली. तत्पूर्वी शेअर बाजारात ज्याप्रमाणे घंटा वाजवून व्यवहार सुरू होतात, त्याच धर्तीवर येथे या नावीन्यपूर्ण संकल्पनेचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर उद्योजक सुरेश अग्रवाल, रामनिवास मानधनी, रमेशभाई पटेल यांची उपस्थिती होती. यावेळी सीए पीयूष गोयल आणि परताणी यांनी लक्ष्मी कॉटस्पीनची मुहूर्तमेढ ही २००५ मध्ये जालना तालुक्यातील सामनगाव येथे रोवण्यात आल्याचे सांगून संजय राठी तसेच त्यांचे अन्य संचालकांनी २०१७ मध्ये या कंपनीची नोंदणी बॉम्बे स्टॉक एक्सचेंजमध्ये केल्याचे सांगितले. आणि आज या कंपनीला थेट एनएसईमध्ये लिस्टेड होण्यापर्यंतचा इतिहास सांगितला. यावेळी शेअर बाजारातील तज्ज्ञ जोशी यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. या कंपनीतील उत्पादित कपाशीच्या धागा तसेच गठाणींची निर्यात केली जात असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

कार्यक्रमास उद्योजक कांतीलाल राठी, घनश्याम गोयल, सीए श्रीनिवास भक्कड मधुसूदन भक्कड, सुनील रायठ्ठा, दिनेश राठी, डी. बी. सोनी, सीए गोविंप्रसाद मुंदडा, लक्ष्मी कॉटस्पीनचे संचालक शिवप्रसाद मुंदडा, कैलास लोया, भावेश पटेल, संतोष मुंदडा, आशिष भाला, व्यापारी महासंघाचे हस्तीमल बंब विनीत साहनी, सतीश पंच, अरुण अग्रवाल, नितीन काबरा, विजय राठी, जगदीश राठी, विवेक मणियार यांच्यासह अन्य उद्योजक आणि व्यापाऱ्यांची उपस्थिती होती.




शेअर बाजारात लक्ष्मी कॉटस्पीनच्या नामांकनाची नोंद शुक्रवारी केली. (छाया : मनोज जांभोरकर)

## वस्त्र उद्योजकांना मोठी संधी

- केंद्र आणि राज्य सरकारकडून वस्त्रोद्योगाला मोठी चालना दिली जात आहे. यासाठी कच्चा माल अर्थात कापूस हा विदर्भ आणि मराठवाड्यात मुबलक प्रमाणत उपलब्ध असून, त्यातून धागानिर्मितीसह तयार कपडे व अन्य वस्तू बनविण्यास मोठा वाव आहे.
- त्यामुळे स्टील उद्योगाप्रमाणेच उद्योजकांनी टेक्सस्टाइल उद्योगात उतरल्यास भविष्यात अनेक चांगल्या संधी असल्याची माहिती संजय राठी यांनी दिली. तसेच आज एनएसईमध्ये कंपनीची नोंदणी झाल्याने एक स्वप्नपूर्ती झाल्याचे समाधानही राठी यांनी यावेळी व्यक्त केले.

## दोन दुचाकींच्या अपघातात एक ठा

लोकमत न्यूज नेटवर्क

**देऊळगाव राजा :** दोन दुचा समोरासमोर धडक होऊन झा अपघातात एकजण ठार तर ए गंभीर जखमी झाल्याची गुरूवारी रात्री ९ वाजण्याच्या सु सिंदखेड राजा रोडवरील कॉटनसमोर घडली. या अप गणेश दामोदर गायकवाड (३ खल्याळ गव्हाण) हा जागीच झाला तर भगवानराव आढाव ( हे गंभीर जखमी झाले.

देऊळगाव राजा शहरा सिंदखेड राजा रोडवर गुरूवारी रा नऊ वाजण्याच्या सुमारास द दुचाकींची समोरासमोर धडक झा या अपघातात गणेश गायक (३०, रा. खल्याळ गव्हाण) जागीच ठार झाला तर भग आढाव (४०) हे गंभीर जखमी झा हा अपघात झाल्यानंतर नागरिक घटनास्थळी गर्दी केली हो नागरिकांनी दोन्ही जखमींना ग्राम रूग्णालयात उपचारासाठी पाठव

टीएमटी सळई

टील

**जालना** - ललीत ट्रेडींग कंपनी, मे.ललीत उद्योग, धनलक्ष्मी स्टील ट्रेडर्स, स्वप्नील हार्डवेअर, श्री गजानन ट्रेडर्स, **अंबड**- श्री अक्षय ट्रेडींग कंपनी, **घनसावंगी** - सौदागर ट्रेडर्स, **तीर्थपुरी** - मंगलमुर्ती हार्डवेअर, **कुंभारपिंपळगाव** - शीतल ट्रेडर्स, **परतूर**- गजानन ट्रेडर्स, **आष्टी** - लक्ष्मी व्यंकटेश ट्रेडर्स, **वाटूरफाटा**- सिध्दीविनायक ट्रेडर्स, **मंठा** - श्रीकृष्ण स्टील, **दाभाडी** - चैतन्य ट्रेडर्स, **तळणी** - समिहा ट्रेडर्स, **जाफ्राबाद** - श्री गजानन ट्रेडर्स, **माहोरा** - शिवम हार्डवेअर, **भोकरदन** - रेहान ट्रेडर्स, **वालसावंगी**- ऋषिकेश ट्रेडर्स, **हसनाबाद** - तिरूपती हार्डवेअर, **राजूर** - रूद्राणी ट्रेडर्स, **धावडा** - सुरेश ट्रेडर्स, **भारज (बु)**- सदगुरू हार्डवेअर अ‍ॅण्ड मशिनरी, **वरूड** - नमोकार ऐजन्सी.

# स्टील व सीड्स उद्योजकांनी वस्त्रोद्योगात गुंतवणूक करावी-संजय राठी

## लक्ष्मी कॉटस्पीन लिमिटेड एनएसई (National Stock Exchange) च्या मेन बोर्डावर दाखल





जालना(प्रतिनिधी)-जालना स्टील व सीड्स हब म्हणून परिचित आहे. स्टील व सीड्स उद्योजकांनी वस्त्रोद्योग उद्योगात गुंतवणूक करावी तसेच स्टील व सीड्स उद्योजकांनी स्वतःचा आयपीओ आणून स्वतःचा ब्रॅन्ड निर्माण करावा असे लक्ष्मी कॉटस्पीन लिमिटेडचे कार्यकारी संचालक संजय राठी याप्रसंगी म्हणाले. एनएसईच्या मेन बोर्डवर लक्ष्मी कॉटस्पीन लिमिटेड (सामनगाव ता.जालना) आज दाखल झाले. त्या प्रसंगी आयोजित बेल सिरेमनी कार्यक्रमा प्रसंगी संजय राठी बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर उद्योजक सुरेश अग्रवाल, श्राईश्री रमेशभाई पटेल, राम निवास मानधनी यांची उपस्थिती होती.

**पुढे बोलताना संजय राठी म्हणाले की, २० ते २५ वर्षाअगोदर नामांकित कंपनीचे शेअर्स घेण्यासाठी मी व शिवरतन मुंदडा फॉर्म भरायचो पण आम्हाला ते शेअर्स लागत नव्हते व आमचे पैसे आम्हाला परत मिळत होते. त्यावेळेस स्वतः च्या कंपनीचा आयपीओ आणुन त्यात साम न्य लोकांना गुंतवणूक करता यावी हे स्वप्न उराशी बाळगले व ते स्वप्न लक्ष्मी कॉटस्पीनचा आयपीओ आणुन सत्यात उतरवले याचा मला व माझ्या सर्व राजुरी ग्रुपमधील भागीदारांना गर्व आहे.** मराठवाड्यातील पहिला आयपीओ आणण्याचे भाग्य लक्ष्मी कॉटस्पीनला दोन वर्षाआधी मिळाले. कंपनी शेअर बाजारात लिस्टेड झाली त्यावेळेस सहा हजार शेअर्स चा एक लॉट विकत घ्यावा लागत होता पण आजपासून एनएसई मेन बोर्डावर आल्यामुळे गुंतवणूकदारांना एक शेअर्सची खरेदी सुध्दा करता येवू शकते तरी आमच्यावर विश्वास ठेऊन गुंतवणूकदारांनी जास्तीत जास्त प्रमाणात गुंतवणूक करावी अशी अपेक्षा संजय राठी यांनी व्यक्त केली. केन्द्र शासन व महाराष्ट्र राज्य शासनाच्या वस्त्रोद्योगासाठी खुप चांगल्या योजना आहेत व भविष्यात जालना येथे ड्रायपोर्ट होत असल्याने जालन्यातील उद्योजकांनी वस्त्रोद्योगात गुंतवणूक करावी असे आवाहन या प्रसंगी केले.

सीएस ए आर जोशी, सीए आनंद परतानी, सीए पियुष अग्रवाल यांनी आपल्या मनोगतातुन आयपीओचे भविष्यातील फायदे सांगुन लक्ष्मी कॉटस्पीन परीवालाला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी उद्योजक सर्वश्री डी.बी.सोनी, कैलास लोया, शिवरतन मुंदडा, घनश्याम गोयल, जगदीश राठी, पुरुषोत्तम तोष्णीवाल, श्रीनिवास भक्कड, मधु भक्कड, शिवकुमार लोहीया, आशीष भाला, दिनेश राठी, रमेश मुंदडा, भावेश पटेल, संतोष मुंदडा, ओमप्रकाश मंत्री, सुनिलभाई रायठठ्ठा, कांतीलाल राठी, (पान २ वर)

मोठ्या परिश्रम व मेहनतीने लक्ष्मी कॉटस्पीनने या यशापर्यंत झेप घेतली आहे. ही खरोखरच कौतुकाची गोष्ट आहे. भविष्यात अशाच प्रकारे लक्ष्मी कॉटस्पीटन कंपनीने नावलौकिक करावा. **-सुरेश अग्रवाल**

जालन्यातील लक्ष्मी कॉटस्पीन ही पहिली कंपनी आहे ती एनएसईच्या मेन बोर्डावर आली आहे. ही जालनेकरांनी खरोखरच आनंदाची व कौतुकास्पद बाब आहे. भविष्यात कंपनीचे शेअर्स वाढत जावो ह्याच यानिमित्ताने शुभेच्छा. **-भाईश्री रमेशभाई पटेल**

लक्ष्मी कॉटस्पीनने एनएसईच्या मेन बोर्डावर झेप घेतल्याने ही जालनेकरांसाठी अभिमानास्पद बाब आहे. कंपनीचे सर्व संचालक मोठ्या परिश्रम व मेहनतीने कंपनीचा कारभार चालवत आहे. या यशाबद्दल कंपनीच्या सर्व संचालकांना शुभेच्छा.

**-रामनिवास मानधनी**

### उद्योजक घनश्याम गोयल व डी.बी.सोनी यांचा सत्कार

कालिका स्टीलचे संचालक उद्योजक घनश्याम गोयल व मेटारोल्स प्रा.लि.चे कार्यकारी संचालक डी.बी. सोनी यांची महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स इंस्ट्रीजस अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चरच्या गव्हर्निंग कौन्सिलपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा लक्ष्मी कॉटस्पीन प्रा.लि. च्या वतीने यावेळी सत्कार करण्यात आला.